| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ४४ वा | गुरूवार, दिनांक ३० एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## लहान वयात शाळेत जाऊन अभ्यास करायला हवा, पण आई बनवण्याचा विचार करत आहोत : सुप्रिम कोर्ट

***नवी दिल्ली : बलात्कार पीडिता १५ वर्षाची आहे. ती अजूनही एक लहान मुलगीच आहे. या वयात तिने शाळेत जाऊन अभ्यास करायला हवा होता; पण आपण तिला आताच आई बनवण्याचा विचार करत आहोत. या संपूर्ण प्रक्रियेत त्या लहान मुलीला किती वेदना आणि अपमान सहन करावा लागला असेल, याची केवळ कल्पना करा, अशा शब्दांमध्ये गुरूवारी (दि. ३०) सर्वोच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणांची भयावहता स्पष्ट केली. तसेच बलात्कारातील पीडितांना २० आठवड्यांनंतरही नको असलेला गर्भपात करण्याची परवानगी देण्यासाठी कायद्यात सुधारणा करावी, अशी आग्रही विनंतीही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केली. दरम्यान, २४ एप्रिल रोजी, न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने त्या तरुणीला ३० आठवड्यांचा गर्भ वैद्यकीयरीत्या समाप्त करण्याची परवानगी दिली होती. या निकालाविरोधात एम्सने पुनर्विचार याचिका दाखल केली होती.***

एका १५ वर्षीय मुलीला ३० आठवड्यांचा गर्भ वैद्यकीय पद्धतीने नष्ट करण्याची परवानगी देणारा आपलाच आदेश रद्द करण्याची मागणी करणाऱ्या एम्सच्या याचिकेवर सुनावणी करताना, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की, जेव्हा गर्भधारणा ही बलात्काराचा परिणाम असते, तेव्हा त्यासाठी कोणतीही कालमर्यादा (वेळेची अट) नसावी. कायदा हा लवचिक आणि बदलत्या काळाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

खंडपीठाने नमूद केले की, संबंधित गर्भपाताची परवानगी दिली नाही, तर पीडितेच्या मनावर आयुष्यभर न पुसली जाणारी जखम आणि मानसिक आघात राहील.पीडित मातेला कोणताही



कायमस्वरूपी शारीरिक अपंगत्व येत नसेल, तर गर्भपाताची प्रक्रिया पार पाडली जावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.खंडपीठाने एम्सला या मुद्द्यावर पीडितेच्या पालकांचे समुपदेशन करण्यासही सांगितले. तसेच स्पष्ट केले की, या संदर्भातील अंतिम निर्णय हा प्रत्यक्ष पीडितेचाच असणे आवश्यक आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, हे प्रकरण एका १५ वर्षीय मुलीच्या नको असलेल्या गर्भधारणेचे आहे. ही एक उपचारात्मक याचिका आहे. नको असलेली गर्भधारणा कोणावरही बळजबरीने लादली जाऊ शकत नाही. कल्पना करा, ती अजूनही एक लहान मुलगीच आहे. या वयात तिने शाळेत जाऊन अभ्यास करायला हवा होता. पण आपण तिला आताच आई बनवण्याचा विचार करत आहोत. या संपूर्ण प्रक्रियेत त्या लहान मुलीला किती वेदना आणि अपमान सहन करावा लागला असेल, याची केवळ कल्पना करा, असे आवाहनही खंडपीठाने केला.

### या टप्प्यावर गर्भपात करणे शक्य नाही : सॉलिसिटर जनरल

एम्सच्या वतीने बाजू मांडणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी या उपचारात्मक याचिकेचा संदर्भ देत असे नमूद केले की, या टप्प्यावर गर्भपात करणे आता शक्य नाही. जन्मणारे बाळ हे जिवंत असेल, परंतु त्याला गंभीर शारीरिक व्यंग (विकृती) असण्याची शक्यता आहे. अल्पवयीन असलेल्या या मातेला आयुष्यभर आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागेल आणि कदाचित भविष्यात तिला पुन्हा गर्भधारणा करणेही शक्य होणार नाही. या बाळाला दत्तक देण्यासाठी दिले जाऊ शकते. आता गर्भधारणेला ३० आठवडे पूर्ण झाले आहेत.

### निर्णय विचारपूर्वक घेण्यास एम्स मदत करू शकते

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, गर्भसमाप्तीबाबतचा निर्णय हा पीडितेचा आणि तिच्या पालकांचाच असावा; तसेच, त्यांना हा निर्णय विचारपूर्वक घेण्यास एम्स मदत करू शकते. २४ एप्रिल रोजी, न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने त्या तरुणीला ३० आठवड्यांचा गर्भ वैद्यकीयरीत्या समाप्त करण्याची परवानगी दिली होती. या निकालाविरोधात एम्सने पुनर्विचार याचिका दाखल केली होती.

## बच्चू कडूंचा पक्षप्रवेश

### मी धनुष्यबाण हाती घेतो, आता शिवसेनेतच राहणार




**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून चाललेल्या राजकीय चर्चांवर अखेर प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी पडदा टाकला आहे. आपण शिवसेनेचा धनुष्यबाण पुन्हा हाती घेत आहोत, असे बच्चू कडूंनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं आहे. त्यांना एकनाथ शिंदेच्या शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी मिळणार असल्याच्या जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात रंगू लागल्या होत्या. यासाठी बच्चू कडू प्रहार संघटनादेखील शिवसेनेत विलीन करणार असल्याचं बोललं जात होतं. यासंदर्भात बच्चू कडूंनी आज सकाळी प्रसारमाध्यमांशी बोलताना नेमकी भूमिका स्पष्ट केली आहे. यानंतर दुपारी पक्षप्रवेशाच्या वेळी बच्चू कडूंनी आपण आता पुढची १५-२० वर्षं जे काही राजकारण असेल, ते शिवसेनेतच राहील, असेही स्पष्ट केलं. यावेळी एकनाथ शिंदेंनी बच्चू कडूंच्या विधानपरिषद उमेदवारीचीही घोषणा केली.

आपण पक्षप्रवेशासाठी ठेवलेल्या सर्व अटी एकनाथ शिंदेंनी मान्य केल्याचं यावेळी बच्चू कडू म्हणाले. शिवसेनेचा धनुष्यबाण मी हाती घेत आहे. काल-परवा याबद्दल बरीच चर्चा झाली आहे. आमचे सगळे मुद्दे शिवसेनेनं स्वीकारले आहेत. हमी भावातील सुधारणा, लाडक्या बहिणींमधल्या विधवा बहिणींचा मुद्दा, दिव्यांगाच्या मंत्रालयाचं बळकटीकरण हे सगळे मुद्दे मान्य झाल्यानंतरच हा निर्णय मी घेत आहे. मी प्रामाणिकपणे काम करत राहीन. शिवसेनेची राजकीय ताकद मजबूत करण्याचं काम आम्ही प्रामाणिकपणे करत राहू. पण त्याबदल्यात आम्हाला शेतकऱ्यांची, दिव्यांगांची ताकद हवी आहे. त्यावर कोणतीही तडजोड होणार नाही. शिंदेंच्या नेतृत्वाखाली दिव्यांग मंत्रालय उभं राहिलं. पण त्याच्या बळकटीकरणासाठी काम झालं पाहिजे, असे ते म्हणाले.

आज मी धनुष्यबाण हाती घेतला आहे. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात शेतकरी व दिव्यांगांसाठी हा धनुष्यबाण मी उचलला आहे. आता शिवसेनेतच प्रामाणिकपणे व तेवढ्याच ताकदीने माझा राजकारणातला प्रवास एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात होणार आहे. माझी सुरुवात शिवसेनेपासून झाली. आता पुढची १५-२० वर्षं जे काही राजकारण असेल तेही शिवसेनेत एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात राहील अशी ग्वाही मी आज देतो, अशा शब्दांत पक्षप्रवेशाबाबत बच्चू कडूंनी भूमिका स्पष्ट केली. यावेळी शिवसेनेकडून बच्चू कडू व नीलम गोऱ्हे या दोन नावांची घोषणा एकनाथ शिंदेंनी विधानपरिषद निवडणुकीसाठी केली आहे.

## प्रभात किरणे

ज्यांना नाही मरण
त्यांनी कसेही वागावे
अनेक माती होऊन
मातीत जे जे विरले
कधी पुन्हा या जगी
कोणी त्यास पाहिले
अजूनही जिवंत येथे
ज्यांनी विचार पेरले
-------
इंजि. नागनाथ कलवले, लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर

## चिमटा दयाचा



लातूरकरांच्या समस्या सुटल्या पाहिजेत ! बैठका व सुचनापेक्षा वेळेत काम होण्याची शिस्त लावली पाहिजे !!

## उष्णतेच्या लाटेची तीव्रता लक्षात घेवून 'नीट' परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करा

### जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांचे निर्देश

**लातूर/प्रतिनिधी** :लातूर जिल्ह्यातील ३४ परीक्षा केंद्रांवर आगामी ३ मे २०२६ रोजी नीट युजी २०२६ परीक्षा पार पडणार असून, सुमारे १६ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. वाढते तापमान आणि उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक सज्जता आणि उपाययोजना ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिले आहेत. जिल्हा प्रशासनाने या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक घेतली असून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विविध पावले उचलली जात आहेत.




वाढत्या उष्णतेचा विचार करता प्रत्येक परीक्षा केंद्रावर आरोग्य पथके तैनात केली जाणार आहेत. या पथकांकडे उष्माघातावरील उपचारासाठी आवश्यक औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील, तसेच वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिकांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांसाठी सावलीची व्यवस्था आणि दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, शहरात विद्यार्थी आणि पालकांची होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाला चोख बंदोबस्ताचे आदेश दिले आहेत.

परीक्षा केंद्रांवर होणारी विद्यार्थ्यांची तपासणी आणि बायोमेट्रिक हजेरीची प्रक्रिया अधिक गतिशील करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना विनाकारण विलंब होणार नाही. सुरक्षेच्या आणि नियोजनाच्या दृष्टीने प्रत्येक केंद्रावर कर्तव्य दंडाधिकारी म्हणून महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, भरारी पथकेही गठीत करण्यात येणार आहेत.

लातूर जिल्ह्यात ३ मे रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत होणाऱ्या या परीक्षेदरम्यान प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या तात्काळ निवारणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षाच्या प्रमुखपदी नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कक्षामध्ये आरोग्य, पोलीस, महावितरण आणि परिवहन विभागाचे अधिकारी २ आणि ३ मे रोजी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत उपस्थित राहतील. नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी नियंत्रण कक्षाचा ९३५६४०४९२० हा दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षेशी संबंधित अडीअडचणी मांडता येतील.

## जनगणनेसाठी 'स्व-गणना' पोर्टल १ मे पासून होणार कार्यान्वित

➤ घरबसल्या नोंदणी करण्याचे प्रशासनाचे आवाहन

➤ **'जनगणना २०२७'** अंतर्गत घरयादी व घरगणनेची स्वगणना

**लातूर/प्रतिनिधी :** जनगणनेची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी प्रशासनाने स्व-गणना सुविधा उपलब्ध करून दिली आहे. राज्यात १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणनेची सुविधा उपलब्ध राहणार आहे. यासाठी नागरिकांनी सर्वप्रथम https://se.census.gov.in या अधिकृत पोर्टलला भेट देऊन कुटुंब प्रमुखाचे नाव व मोबाईल क्रमांकासह नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

भारताची जनगणना २०२७ ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून ही प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये राबवली जाणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा घरयादी व घरगणना १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडेल, तर दुसरा टप्पा प्रत्यक्ष लोकसंख्या गणना फेब्रुवारी २०२७ मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात घरी येणाऱ्या प्रगणकांना एकूण ३४ प्रश्नांची योग्य उत्तरे देऊन सहकार्य करावे. तसेच, भारत सरकारने या प्रक्रियेत 'स्वगणनेचा' विशेष पर्याय उपलब्ध करून दिला असून महाराष्ट्रासाठी हा कालावधी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ असा राहणार आहे. स्व-गणनासाठी पोर्टलवर नोंदणी करताना एकदा निश्चित केलेले कुटुंब प्रमुखाचे नाव बदलता येणार नाही, तसेच एका मोबाईल क्रमांकावरून केवळ एकाच कुटुंबाची नोंदणी करता येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.




नोंदणीनंतर प्राप्त झालेला ओटीपी प्रविष्ट करून आपली भाषा निवडावी आणि जिल्ह्यासह राहत्या ठिकाणचा पिन कोड भरून नकाशावरील लाल मार्करद्वारे घराचे अचूक स्थान निश्चित करावे. पुढील टप्प्यात, पोर्टलवरील मार्गदर्शक सूचनांनुसार घरयादी व घरगणनेची सविस्तर प्रश्नावली भरून सर्व माहितीची पडताळणी करावी आणि माहिती अचूक असल्याची खात्री पटल्यावर ती अंतिम सादर (सबमिट) करावी.

एकदा माहिती अंतिम सादर केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही आणि त्यानंतर नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर 'H' या अक्षराने सुरू होणारा ११-अंकी 'SE ID' प्राप्त होईल. जनगणनेची ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत जेव्हा शासकीय प्रगणक प्रत्यक्ष घराला भेट देतील, तेव्हा त्यांना हा SE ID सांगणे आवश्यक आहे, जेणेकरून डिजिटल माहितीची प्रत्यक्ष पडताळणी होऊन जनगणनेची नोंद यशस्वीरीत्या पूर्ण होईल. तरी सर्व नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांची बिनचूक उत्तरे देऊन या राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे करण्यात येत आहे.

## वाढत्या तापमानामुळे घाबरून न जाता नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी

### जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या वातावरणातील बदलांमुळे पृथ्वीचे तापमान वेगाने वाढत आहे. मार्च महिन्यापासूनच राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चढलेला पाहायला मिळत आहे. आगामी काळात उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि खबरदारी बाळगावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

**उष्णतेची लाट म्हणजे काय?**

हवामान खात्याच्या निकषानुसार, एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस कमाल तापमान सरासरीपेक्षा ३ अंश सेल्सिअसने जास्त असेल किंवा सलग दोन दिवस तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्यास त्या भागात उष्णतेची लाट आली असे संबोधले जाते. उन्हाळ्याच्या काळात सन बर्न, हिट क्रॅम्प्स (स्नायूंना गोळे येणे), हिट एक्झोर्शन (प्रचंड थकवा) आणि हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारखे आजार उद्भवू शकतात.

**उष्माघाताचा सर्वाधिक धोका कोणाला?**

- उन्हात कष्टाची कामे करणारे मजूर व शेतकरी.
- वृद्ध व्यक्ती आणि लहान मुले.
- गरोदर महिला व स्थूल व्यक्ती.
- मधुमेह, हृदयविकार असलेले रुग्ण किंवा अपुरी झोप घेणारे लोक.
- कारखान्यात बॉयलरजवळ काम करणारे कामगार.

**उष्माघाताची लक्षणे**

**किरकोळ लक्षणे:** प्रचंड थकवा जाणवणे, ताप येणे, शरीरावर पुरळ उमटणे, चक्कर येणे किंवा हाता-पायांच्या स्नायूंना गोळे येणे.

**गंभीर लक्षणे:** त्वचा गरम व कोरडी पडणे, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगवान होणे, मानसिक बेचैनी किंवा बेशुद्धावस्था येणे.

**प्रतिबंधात्मक उपाय**

**काय करावे? :** पुरेसे पाणी प्या आणि प्रवासात नेहमी पाणी सोबत ठेवा. पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे सैल सुती कपडे वापरा. उन्हात जाताना छत्री, टोपी, चष्मा आणि पादत्राणांचा वापर करा. घर थंड ठेवण्यासाठी वाळ्याचे पडदे, पंखा किंवा कुलरची मदत घ्या. लिंबू सरबत किंवा ओआरएस यांसारख्या पेयांचे सेवन करा.

**काय करू नये?:** शक्यतो दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात बाहेर जाणे टाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या बंद वाहनात ठेवू नका. मद्यपान, चहा, कॉफी किंवा सॉफ्ट ड्रिंक्स टाळा. अधिक प्रथिनांचे किंवा शिळे अन्न खाऊ नका.

**तातडीचे उपचार घ्या**

एखाद्या व्यक्तीला उष्माघाताचा त्रास झाल्यास, त्या रुग्णाला तातडीने सावलीत किंवा हवेशीर खोलीत हलवावे. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात किंवा थंड पाण्याने अंग पुसून घ्यावे. रुग्णाची प्रकृती गंभीर असल्यास वेळ न घालवता जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करावे.



**आरोग्य विभागामार्फत सज्जता**

उष्णतेच्या लाटेचा इशारा लक्षात घेता, जिल्ह्याची ग्रामीण आरोग्य यंत्रणा सतर्क करण्यात आली आहे. १ मार्चपासूनच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व शासकीय दवाखान्यांमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षांमध्ये २ खाटा राखीव असून औषधसाठा, पंखे, कुलर आणि थंड पाण्याची सोय उपलब्ध आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत गृहभेटी देऊन जनजागृती केली जात आहे, तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिकाही सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांनी उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास घाबरून न जाता तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांनी केले आहे.

# ‘कृष्णा’ची कलनरी आर्ट्स इन्स्टिट्यूट राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करेल : मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील

## ➤ पुण्यात कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कलनरी आर्टस् इन्स्टिट्यूटचे उत्साहात भूमिपूजन
## ➤ सौ. गौरवी भोसले यांच्या कल्पक दूरदृष्टीतून पुण्यात नविन इन्स्टिट्युट

**कराड/प्रतिनिधी :** कृष्णा विश्व विद्यापीठाची कलनरी आर्ट्स इन्स्टिट्यूट ही नवीन शैक्षणिक धोरणाला अनुरूप संस्था असून, ती राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केला. ते बालेवाडी-पुणे येथे नव्याने सुरू होत असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ कलनरी आर्ट्स अँड सायन्स या संस्थेच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते.



व्यासपीठावर कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले,राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, सौ. सुवर्णादेवी देशमुख, सौ. उत्तराताई भोसले, कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, सौ. गौरवी भोसले, माजी आमदार संजय जगताप, पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्य सौ. मयुरी कोकाटे, नगरसेविका सौ. रोहिणी चिमटे, कृष्णा विद्यापीठाचे विश्वस्त दिलीपराव पाटील, विनायक भोसले, कुलगुरू डॉ. नीलम मिश्रा, लहू बालवडकर, आशिष जैन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री ना. पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणलेले नवीन शैक्षणिक धोरण हे संधी आणि समाधान मिळवून देणारे आहे. भारतात कौशल्यप्राप्त व्यक्तींची संख्या वाढली पाहिजे यावर त्यांचा भर आहे. या कौशल्यामुळे नोकरीची संधी त्वरित प्राप्त होणार आहे. अलीकडच्या काळात चांगल्या हॉटेलमध्ये जेवण करणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली आहे. अशाठिकाणी चांगल्या शेफना मोठी मागणी आहे. अशावेळी सौ. गौरवी भोसले यांनी कल्पक दूरदृष्टी दाखवत कृष्णा विद्यापीठाच्या माध्यमातून या प्रकारची नाविन्यपूर्ण इन्स्टिट्यूट पुण्यात उभी करण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. या संस्थेच्या माध्यमातून या क्षेत्रातील तज्ञ नक्कीच निर्माण होतील याची मला खात्री आहे, असे ना. पाटील नमूद केले.

यावेळी डॉ. सुरेश भोसले म्हणाले, कलनरी आर्टस् हे एक विज्ञान आहे. देशभर या क्षेत्राकडे गंभीरपणे पाहिले जात आहे. या क्षेत्रातील उच्चशिक्षित घडवण्यासाठी ही इन्स्टिट्यूट प्रयत्न करणार आहे. याठिकाणी १० किचन प्रयोगशाळा असून, ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स शिकवले जाणार आहेत. यानिमित्ताने कृष्णा विद्यापीठ नव्या क्षेत्रात प्रवेश करत आहे.

आमदार डॉ. अतुलबाबा भोसले म्हणाले, अत्यंत चांगल्या प्रतीचे शेफ घडविण्याचे काम या संस्थेत होणार आहे. आधुनिक पाककलेचे शिक्षण येथे दिले जाणार आहे.

माजी आमदार संजय जगताप म्हणाले, आज प्रत्येक देशात फूड इंडस्ट्रीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात आज ही इन्स्टिट्यूट उभी राहत आहे, याचा आनंद होत आहे.

कृष्णा फौंडेशनच्या कार्यकारी संचालिका सौ. गौरवी भोसले प्रास्तविक करताना म्हणाल्या, की अन्न हे पूर्णब्रह्म समजले जाते. पण योग्य आहार नसेल तर जीवनशैलीजन्य आजार जडतात. त्यामुळे पोषणयुक्त आणि सकस आहाराचे महत्व वाढत असून, या क्षेत्रातील तज्ञ घडविण्याचे काम या इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून केले जाणार आहे.

प्रारंभी ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले आप्पासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाला सातारा जि. प. सदस्य धनंजय ताटे, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक वसंतराव शिंदे, बाबासो शिंदे, सयाजी यादव, जे. डी. मोरे, अविनाश खरात, विलास भंडारे, कराडचे नगरसेवक सुहास जगताप, माजी नगरसेवक इंद्रजीत गुजर, कृष्णा बँकेचे संचालक शिवाजीराव थोरात, जयवंतराव भोसले नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाटील, कृष्णा विश्व विद्यापीठाचे कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, सहाय्यक कुलसचिव अर्चना कौलगेकर, अधिष्ठाता डॉ. वैशाली मोहिते, डॉ. जी. वरदराजुलू, डॉ. गिरीश पठाडे, डॉ. एन. आर. जाधव, डॉ. शशिकिरण एन. डी., कृष्णा सरिता बझारच्या अध्यक्ष प्रा. डॉ. स्नेहल राजहंस, जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक फरांदे यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**भोसले कुटुंबाने निर्माण केलेली कार्यसंस्कृती आदर्शवत**

कृष्णा समूहाच्या कार्याचा गौरव करताना नामदार चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, की भोसले कुटुंबाने एक यशस्वी कार्यसंस्कृती निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली चालवला जाणारा साखर कारखाना, कॉलेज, शाळा, बँका अशा सर्व संस्था यशस्वीपणे सुरू आहेत. या कुटुंबातील सर्व व्यक्ती प्रभावी आहेत. अशा कुटुंबाच्या नेतृत्वाखाली पुण्यात सुरू होत असलेली ही नवीन इन्स्टिट्यूट निश्चितच प्रगतीपथावर जाईल, याची मला खात्री आहे. त्यामुळेच आमदार डॉ. अतुलबाबांच्या आग्रहाखातर मी आज मंत्रिमंडळाची बैठक सोडून, या भूमिपूजन सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित राहिलो आहे.

**विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार**

विद्यार्थ्यांना आधुनिक पाककलेचे धडे मिळावेत आणि या क्षेत्रातील तज्ञांची निर्मिती करण्यासाठी कृष्णा विश्व विद्यापीठाने कलनरी आर्ट इन्स्टिट्यूट पुण्यात सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या ठिकाणी भव्य दहा मजली इमारत उभारली जाणार असून, प्रत्येक मजल्यावर दहा किचन प्रयोगशाळा साकारल्या जाणार आहेत. तळमजल्यावर कॅफे तर वरच्या मजल्यावर रेस्टॉरंट साकारले जाणार असून, या इन्स्टिट्यूटमध्ये भारतीय आणि परदेशी पाककला शिकवणारे विविध ग्रॅज्युएशन आणि पोस्ट ग्रॅज्युएशन अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. या नव्या संस्थेमुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात ‘डॉ. जनार्दन वाघमारे अध्यासन केंद्र’ स्थापन करा

## आ. रोहित पवार यांची राज्यपालांकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे संस्थापक कुलगुरू तसेच थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या नावाने विद्यापीठात 'अध्यासन केंद्र' स्थापन करण्यात यावे, तसेच विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार रोहितदादा पवार यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीचे निवेदन देताना लातूर येथून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे उपस्थित होते.

राज्यपालांना देण्यात आलेल्या निवेदनात डॉ. जनार्दन वाघमारे सरांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करण्यात आला आहे. डॉ. वाघमारे हे केवळ विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरूच नव्हते, तर मराठी भाषा, साहित्य, समीक्षा, शिक्षण, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. मराठवाड्यासारख्या भागातील उच्च शिक्षणाचा पाया त्यांनी मजबूत केला. ग्रामीण आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले दूरदर्शी आणि पुरोगामी शैक्षणिक नेतृत्व कायम स्मरणात राहील, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे यांचे साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अफाट आहे. त्यांचे वैचारिक मार्गदर्शन आणि वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या उद्देशाने त्यांच्या स्मरणार्थ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'डॉ. जनार्दन वाघमारे अध्यासन केंद्र' तातडीने स्थापन करावे व याबाबत सर्व संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी



विनंती आ. रोहित पवार यांनी केली आहे.

अध्यासन केंद्रासोबतच, डॉ. वाघमारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून विद्यापीठाच्या लातूर येथील उपकेंद्रात त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी विशेष मागणीही यावेळी करण्यात आली. या महत्त्वाच्या मागणीच्या वेळी लातूरचे प्रतिनिधी म्हणून ड. निशांत वाघमारे आणि संजय शेटे हे समवेत उपस्थितीत होते.




टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## पुन्हा मराठी..

मराठी गौरव दिवशी
पेटवा नव्याने दिवटी
उत्सव सुसंपन्न होता
मराठी न राहे शेवटी

बोलता कुणी मराठी
कपाळा पडते आठी
मागासला आहेस तू
ताणली जाते भृकटी

सहज करतो उपमर्द
चिडवितो म्हणे घाटी
हिणकस होतो स्वर
करितो विनोद कोटी

किती दिवस लढतेयं
समर्थ सक्षम एकटी
कॅन्हेट शिक्षणपध्दत
मराठी बनते धाकटी

जागे करा आम्हांला
उघडा ज्ञानोबा ताटी
कळू दे या जगताला
सुग्रास व्यंजने ताटी

पुन्हा करा श्रीगणेशा
उजळे नवाक्षर पाटी
मराठी प्रसूती कळा
फळे गोजिरी गोमटी

अभिजात दर्जाटिळा
छान शोभतो ललाटी
अभिमान सार्थ मिरवे
जन्मलो मराठी पोटी

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

## चन्नबसवेश्वर फार्मसीत भव्य आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :**चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर आणि हेल्थ केअर हॉस्पिटल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थी व कर्मचारी यांच्यामध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिरादरम्यान विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सहभागींचे बीएमआय, कॅलरी विश्लेषण, शरीराचे एकूण वजन, शरीरातील चरबीचे प्रमाण, व्हिसरल फॅट, टीएसएफ तसेच मसल्स यांची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर तज्ज्ञांनी सर्वांना निरोगी जीवनशैली अवलंबण्याचा व संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले.

# कामगारांच्या घामाला न्याय कुठे? – लातूरमध्ये वडार समाजातील कामगारांवर अन्याय

## अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची वडार समाज संघाची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर लातूरमध्ये वडार समाजातील बांधकाम कामगारांवर मोठा अन्याय झाल्याचा गंभीर आरोप वडार समाज संघाच्यावतीने करण्यात आला आहे. कोणतीही पडताळणी न करता मोठ्या संख्येने कामगारांचे नोंदणी अर्ज रद्द करण्यात आले आहेत, ही संतापजनक आणि अन्यायकारक बाब असून लोकसेवा हक्क हमी कायद्याचे उल्लंघन झाल्याने याची भरपाई द्यावी तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शासनाने घालून दिलेल्या सर्व अटी पूर्ण करून, ग्रामसेवकाचे सही-शिक्क्यासह बॉण्ड पेपर सादर करत आणि कामगार सेतू सुविधा केंद्रातून कागदपत्रांची तपासणी पूर्ण करूनही, अनेक कामगारांचे नोंदणी अर्ज तब्बल ८ ते ११ महिने प्रलंबित ठेवण्यात आले.

यानंतर कोणतीही प्रत्यक्ष पडताळणी न करता अचानकपणे हे अर्ज रद्द करण्यात आल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रक्रियेमुळे कामगारांचा वेळ वाया गेला, रोजगाराच्या संधी बुडाल्या आणि शासनाच्या योजनांपासून ते वंचित राहिले. एकीकडे सरकारी पातळीवरती सांगण्यात येते की, एकही लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहता कामा नये मात्र याच्या उलट लातूर कामगार कार्यालयाचा कारभार दिसून येतो, असेही यावेळी श्रीकांत मुद्दे म्हणाले. वडार समाज संघाने याला लोकसेवा हक्क हमी कायद्याचे उघड उल्लंघन ठरवत, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त कामगारांना आर्थिक भरपाई देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

जर प्रशासनाने दखल घेतली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या- विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. याप्रसंगी रमाकांत मुद्दे, महेश गुंजाळ, सुनील पवार, सचिन वाडीकर आधी समाज बांधव उपस्थित होते.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **(१) निविदा सूचना क्र.:** १२-२०२२६-SrDENS. **कामाचे नाव:** सोलापूर येथील DRM कार्यालयाच्या आवारातील बागेची दुरुस्ती आणि देखभाल (जुन्या कॉन्फरन्स हॉलच्या मागील बाजूस असलेल्या जुन्या ADRM कक्षासमोरची प्रवेशद्वाराजवळील हेरिटेज बाग), A/93, A/94, A/95, A/92, B/175, RB-IV, 122/A&B, RB-IV 121/A&B, RB-IV/208, RB-IV/207, F/37/A&B, F/36/A&B, C@ 47 & 47@A&B, C@ 47'47A&B (CRMS कार्यालय), NRMU कार्यालय, RB-V/136, 137, RBIV/138, 139, 150, RB-V/146, 147, 149, 155, 156 ऑफिसर्स कॉलनीमधील, डॉ. प्रधान रुग्णालय परिसरातील बाग व स्थानकासमोरील बाग, ऑफिसर्स रेस्ट हाऊस मधील बाग आणि सिद्धेश्वर ऑफिसर्स क्लबमधील जलतरण तलावाजवळील बाग, ट्रॅक मशीन डेपोमधील बाग, RPF बराक, C&W कोचिंग कॉम्प्लेक्स, रनिंग रूम, रेल्वे रुग्णालय परिसरातील बाग, गणेश हॉल कॉलनी (दोन वर्षांसाठी बागेची देखभाल). **कामाचा अंदाजित खर्च:** १२०२९३५४.४८, **अनामत रक्कम:** २४०६००.००. **(२) निविदा सूचना क्र.:** १३-२०२२६-SrDENS. **कामाचे नाव:** (i) SUR विभागांतर्गत ADEN/KLBG उपविभागामध्ये, SUR-WADI सेक्शनमध्ये किमी ५८४.८ ते किमी ५९३.६ (एकूण ८.८ किमी) दरम्यान TWR काम; आणि (ii) Sr.DEN/S/SUR सेक्शनअंतर्गत विविध ठिकाणी MFWP द्वारे ५२ किलो आणि ६० किलो रेल्वे रुळांचे फ्लॅश बट वेल्डिंग Flash Butt Welding करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ५१,२६१,७०५.३७; **अनामत रक्कम:** १,०२५,२००.००. **(३) निविदा सूचना क्र.:** १४-२०२२६-SrDENS. **कामाचे नाव:** SUR-Wadi सेक्शनमधील पूल क्र. ५९६/१ (DN) येथे TBSR काम (एकूण १०४० नग). **कामाचा अंदाजित खर्च:** ३१,०७५,०७६.४२; **अनामत रक्कम:** ६२१,५००.००. **(४) निविदा सूचना क्र.:** १५-२०२२६-SrDENS. कामाचे नाव: १. ADEN/KLBG उपविभागांतर्गत GUR येथे साठवणुकीच्या सुविधांसह नवीन PWI कार्यालय डेपोचे बांधकाम. २. ADEN/KLBG उपविभागांतर्गत Wadi येथे PWI कार्यालय व स्टोअर आणि IOW कार्यालय व स्टोअरचे बांधकाम. ३. ADEN/KLBG अंतर्गत Wadi स्थानकावर लहान TRD डेपोच्या बांधकामासाठी इमारतीचे काम. **कामाचा अंदाजित खर्च:** ५८,२८७,०२५.०१; **अनामत रक्कम:** १,१६५,८००.००. **पूर्ततेचा कालावधी:** अनुक्रमांक १ साठी २४ महिने आणि अनुक्रमांक २, ३ व ४ साठी १२ महिने. **देखभालीचा कालावधी:** अनुक्रमांक १, २ व ३ साठी लागू नाही आणि अनुक्रमांक ४ साठी २४ महिने. **निविदा उघडण्याची तारीख:** अनुक्रमांक १, २ व ४ साठी १८.०५.२०२६ आणि अनुक्रमांक ५ साठी २०.०५.२०२६. क्र. ३. संभाव्य निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख येण्यापूर्वी, या निविदेसंदर्भात जारी करण्यात आलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in** EXP-14

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६